### आजचे पंचांग

दिनांक : २ जुलै २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : द्वितीया तिथी (सकाळी ०९:३७ पर्यंत) त्यानंतर तृतीया तिथी नक्षत्र : उत्तराषाढा नक्षत्र (सकाळी ०९:२६ पर्यंत) त्यानंतर श्रवण नक्षत्र योग : वैधृति योग (सायंकाळी ०४:३८ पर्यंत) त्यानंतर विष्कुम्भ योग करण : गराजा करण (सकाळी ०९:३७ पर्यंत)

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### २ महिन्यातच विजय यांचं सरकार पाडण्याचं षडयंत्र?

**पुणे** : दक्षिण भारतातील तामिळनाडू येथे मोठी घडामोड समोर आली आहे. राज्याच्या गुप्तचर विभागाने एका मोठ्या राजकीय षडयंत्राचा पर्दाफाश केला आहे. या षडयंत्रानुसार अभिनेता ते राज्याचे मुख्यमंत्री बनलेले थलापती विजय यांचं सरकार अवघ्या २ महिन्यातच पाडण्याच्या हालचाली सुरू होत्या. या षडयंत्रात टीव्हीकेच्या १५ आमदारांना एकत्रच राजीनामा द्यायला लावून सरकार अल्पमतात आणण्याचा प्रयत्न सुरू होता. त्यातून विजय यांचं सरकार पाडण्यात येणार होते. मात्र हा डाव गुप्तचर विभागाने उधळला आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 गुरुवार, दि. २ जुलै २०२६ ■ वर्ष - १ ■ अंक - २७७ ■ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### महिलांच्या नावावरील ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मिळकत करात ५० टक्के सवलत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुणे महापालिका हद्दीतील फक्त महिलांच्या नावावर असलेल्या ५०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी मिळकतींना मिळकत करात ५० टक्के सवलत देण्याच्या प्रस्तावाला सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. आता हा प्रस्ताव राज्य सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर या निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४०-अ आणि १४०-ब अंतर्गत करसवलतीसंबंधी तरतुदींचा आधार घेत हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मात्र, या योजनेची अंमलबजावणी काही अटी व शर्तींवर आधारित असेल. त्यानुसार ३१ मार्च २०२५ रोजी ज्या मिळकती महिलांच्या नावावर नोंद आहेत, त्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे. ही सवलत केवळ आर्थिक वर्ष २०२६-२७ मधील चालू मागणीपुरती मर्यादित राहील. १ एप्रिल २०२६ पूर्वीची थकबाकी तसेच व्याज, दंड आणि शास्तीवर कोणतीही सवलत लागू होणार नाही.

अनधिकृत मिळकतींवर लागू असलेली शास्ती कायम राहणार असून, संबंधित कलम २६७ (अ) अंतर्गत नियम लागू राहतील. तसेच, ज्या मिळकतींना सध्या ४० टक्के सवलत लागू आहे, त्यांना ५० टक्क्यांऐवजी २५ टक्के सवलत देण्याचा प्रस्ताव आहे. महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणीस प्रोत्साहन देणे आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे, हा या योजनेमागील उद्देश आहे.

महापालिकेच्या नोंदीनुसार महिलांच्या नावावरील मिळकतींची संख्या सुमारे ७० हजार ७७३ इतकी आहे.

# पादचारी हक्कांचा ऐतिहासिक पुनरुच्चार : फुटपाथवर चालणे हा मूलभूत अधिकार : सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : सर्वोच्च न्यायालयाने अलीकडील निकालात स्पष्ट केले आहे की रस्त्यावर सुरक्षित आणि निश्चित (demarcated) फुटपाथवर चालण्याचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. संविधानातील अनुच्छेद १९(१)(व) अंतर्गत मुक्तपणे फिरण्याच्या अधिकाराचा हा अविभाज्य भाग असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले आहे. तसेच हा अधिकार अनुच्छेद २१ मधील जीवन आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याशीही जोडलेला आहे.

**पादचारी अधिकारांना वाहनांपेक्षा प्राधान्य**

न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत म्हटले की, पादचारींचा फुटपाथवर चालण्याचा अधिकार हा वाहनांच्या हालचालींपेक्षा प्राधान्याचा आहे. म्हणजेच, रस्ते केवळ मोटार वाहनांसाठी नसून पादचारींसाठीही सुरक्षित आणि स्वतंत्र जागा असणे आवश्यक आहे.

**स्थानिक प्रशासनावर स्पष्ट जबाबदारी**

या निकालात न्यायालयाने नगरविकास प्राधिकरणे, महापालिका, पंचायत संस्था आणि संबंधित यंत्रणांवर स्पष्ट जबाबदारी निश्चित केली आहे. त्यांना रस्त्यांवर:

* फुटपाथ तयार करणे



* त्यांचे योग्य नियोजन करणे
* देखभाल व संरक्षण करणे

ही कर्तव्ये बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले आहे.

**राज्यकर्त्यांसाठी आणि व्यवस्थेसाठी संदेश**

हा निर्णय केवळ कायदेशीर नाही तर शहरी नियोजनातील गंभीर त्रुटींवरही प्रकाश टाकतो. भारतातील अनेक शहरांमध्ये फुटपाथ नसणे, अतिक्रमणे, किंवा वाहनांनी त्यांचा वापर करणे ही सामान्य समस्या आहे. न्यायालयाने हे अधोरेखित केले की पादचारींच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे हे संविधानिक हक्कांचे उल्लंघन ठरू शकते.

निष्कर्ष : या निर्णयामुळे चालणे ही साधी दैनंदिन क्रिया नसून ती संविधानाने संरक्षित केलेला मूलभूत अधिकार आहे हे स्पष्ट झाले आहे. मात्र, या अधिकाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही स्थानिक प्रशासनाच्या इच्छाशक्तीवर आणि शहर नियोजनाच्या गुणवत्तेवर अवलंबून राहणार आहे.

## दक्षिण कमांडच्या सरसेनापतीपदी लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर; पुण्यात पदभार स्वीकारला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : भारतीय लष्कराच्या पुणेस्थित दक्षिण कमांडच्या जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ (GOC-in-C) पदाचा कार्यभार लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर (AVSM, VSM) यांनी बुधवारी स्वीकारला. त्यांनी लेफ्टनंट जनरल संदीप जैन यांच्याकडून पदभार स्वीकारला. लेफ्टनंट जनरल संदीप जैन यांची नुकतीच भारतीय लष्कराच्या उपप्रमुख (Vice Chief of Army Staff) पदावर नियुक्ती झाली आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यांनी पुण्यातील सदर्न कमांड वॉर मेमोरियल येथे शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर दक्षिण कमांड मुख्यालयात त्यांना औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. यावेळी त्यांनी लष्कराची युद्धसज्जता अधिक बळकट करणे, संयुक्त लष्करी कारवाईला प्राधान्य देणे, स्वदेशी संरक्षण क्षमतांचा विकास करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने अवलंब करणे यावर भर देण्याचे निर्देश दिले.



लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर हे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA), खडकवासला येथील माजी विद्यार्थी असून डिसेंबर १९८८ मध्ये ७४ आर्मर्ड रेजिमेंटमध्ये त्यांची नियुक्ती झाली होती. चार दशकांहून अधिक काळाच्या सेवेत त्यांनी आर्मर्ड रेजिमेंट, स्वतंत्र आर्मर्ड ब्रिगेड, इन्फंट्री डिव्हिजन आणि स्ट्राईक कॉर्प्सचे नेतृत्व केले आहे. अलीकडेच त्यांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान २ कॉर्प्सचे नेतृत्व करत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

दक्षिण आणि मध्य भारताच्या संरक्षणदृष्ट्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या दक्षिण कमांडचे नेतृत्व आता लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यांच्या हाती आले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली कमांडची कार्यक्षमता आणि संरक्षण सज्जता अधिक मजबूत होईल, असा विश्वास संरक्षण वर्तुळातून व्यक्त करण्यात येत आहे.

## पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामठे यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची श्रद्धांजली

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निष्ठावान, विश्वासू सहकारी हरपला – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष जालिंदर कामठे यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद असून, त्यांच्या निधनाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एक निष्ठावान, विश्वासू सहकारी हरपल्याची शोकभावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, जालिंदर कामठे यांनी सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, कार्यनिष्ठा आणि जनसेवेची मूल्ये जपत पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी ग्रामीण विकास, लोककल्याण आणि प्रशासनातील परिणामकारकतेला प्राधान्य देत उल्लेखनीय कार्य केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीकरणात त्यांचा मोठा सहभाग होता. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे ते अत्यंत विश्वासू सहकारी होते. पक्षाच्या विचारांशी असलेली त्यांची निष्ठा, कार्यकर्त्यांशी जपलेला आत्मीय संवाद आणि जनतेच्या प्रश्नांबाबतची त्यांची संवेदनशीलता सदैव स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने एक अनुभवी, निष्ठावान आणि समर्पित कार्यकर्ता गमावला आहे.

## कॅफेतील गैरवर्तन भोवले; डेक्कन पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक निलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : डेक्कन जिमखाना परिसरातील एका कॅफेमध्ये रात्रगस्ती दरम्यान कथित गैरवर्तन आणि तोडफोड केल्याप्रकरणी डेक्कन पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक (PSI) संदीप कदम यांना निलंबित करण्यात आले आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांनी विभागीय चौकशीअंती हा आदेश जारी केला.

ही घटना ६ जून २०२६ रोजी पहाटे सुमारे १.४५ वाजता डेक्कन जिमखाना येथील शिरोळे रस्त्यावरील 'फ्लाइंग जिप्सी कॅफे' येथे घडली. रात्रगस्तीवर असलेले झडख कदम कॅफेमध्ये दाखल झाले. त्यावेळी कॅफे बंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. आरोपानुसार, त्यांनी हातातील काठीने टेबलावरील कॉफीचे कप व खाद्यपदार्थ खाली पाडले, ग्राहकांना तातडीने बाहेर जाण्यास सांगितले आणि कर्मचाऱ्यांशी अरेरावीची वागणूक केली. या संपूर्ण घटनेचे उउद्ध फुटेज समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली.

प्राथमिक चौकशीत संबंधित अधिकाऱ्याचे वर्तन पोलीस दलाच्या शिस्तीला आणि प्रतिमेला धक्का पोहोचवणारे असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. त्यानंतर अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांनी झडख संदीप कदम यांना निलंबित करण्याचे आदेश दिले. विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबन कायम राहणार असून पुढील शिस्तभंगाची कारवाई चौकशी अहवालानुसार केली जाणार आहे. दरम्यान, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी यापूर्वीच रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या व्यावसायिक आस्थापनांवर कारवाई करताना पोलिसांनी थेट आस्थापनात प्रवेश न करता व्यवस्थापकाला बाहेर बोलावून सूचना द्याव्यात, अशा स्पष्ट सूचना दिल्या होत्या. या प्रकरणामुळे त्या सूचनांच्या अंमलबजावणीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## तोहीद खान हत्या प्रकरणावरून सभागृहात राजकीय वाद: न्यायाऐवजी नियमांची ढाल की संवेदनशीलतेचा अभाव?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : परळीतील तरुण तोहीद खान हत्या प्रकरणावर राज्य विधिमंडळात झालेली चर्चा ही गुन्हेगारीच्या गंभीर प्रश्नांपेक्षा अधिक राजकीय संघर्षाचे मैदान बनल्याचे चित्र समोर आले आहे. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांनी पीडित कुटुंबाला न्याय आणि आर्थिक मदतीची मागणी करताना विषय सभागृहात मांडला, मात्र आमदार प्रकाश सोळंके यांनी नियमांचा आधार घेत या मुद्द्यावर आक्षेप घेतल्याने वाद निर्माण झाला.

मुंडेंनी उपस्थित केलेला मुद्दा हा केवळ वैयक्तिक नव्हता, तर वाढत्या गुन्हेगारी आणि पीडित कुटुंबाच्या परिस्थितीशी संबंधित असल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत तांत्रिक नियमांच्या आधारे चर्चेला विरोध करणे हे काहींच्या मते संवेदनशीलतेचा अभाव मानले जात आहे.

दुसरीकडे, सोळंके यांनी उपस्थित केलेला आक्षेप हा सभागृहातील कार्यपद्धती आणि नियमांच्या चौकटीशी संबंधित होता, असा दावा केला जातो. मात्र, गंभीर गुन्हेगारी प्रकरणावर चर्चा सुरू असताना नियमांचा मुद्दा पुढे



आणणे हे जनभावनेच्या विरोधात गेले, अशी टीका होत आहे. सभापतींनी हस्तक्षेप करत हा मुद्दा पूर्वपरवानगीने मांडल्याचे स्पष्ट केल्यानंतरही, या वादाने राजकीय रंग घेतला. त्यातून स्थानिक पातळीवरही प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, समाजमाध्यमांवर या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या संपूर्ण घटनेत सर्वात महत्त्वाचा मुद्दा हरवलेला दिसतो तो म्हणजे पीडित कुटुंबाचा न्याय. गुन्हेगारी प्रकरणात विधिमंडळाचा उद्देश कायदा-सुव्यवस्था आणि न्यायव्यवस्थेला बळ देणे असायला हवा, परंतु प्रत्यक्षात चर्चा नियम विरुद्ध भावना आणि राजकीय मतभेद यामध्ये अडकलेली दिसते.

अशा घटनांमुळे लोकप्रतिनिधींनी जनहितापेक्षा राजकीय प्रतिमेला आणि प्रक्रियात्मक वादांना अधिक महत्त्व दिल्याचा प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित होतो.

## वारकऱ्यांसाठी महापालिकेचा अनोखा उपक्रम; पालखी सोहळ्यात पायांच्या मोफत मसाजची सुविधा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी पुणे महानगरपालिकेने (झचउ) यंदा एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. पालखी मार्गावरील प्रमुख विसाव्याच्या ठिकाणी वारकऱ्यांना मोफत पायांचा मसाज (त्रीं चरीरसश) करून देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. दीर्घ पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करण्यासाठी आणि वारकऱ्यांना तात्पुरता आराम मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या समन्वयातून या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार असून, प्रशिक्षित फिजिओथेरपिस्ट आणि स्वयंसेवकांच्या मदतीने पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी मसाज केंद्रे उभारली जाणार आहेत. याशिवाय वारकऱ्यांसाठी प्राथमिक आरोग्य तपासणी, रक्तदाब आणि रक्तातील साखरेची तपासणी, तसेच आवश्यक औषधोपचाराचीही मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यंदाच्या आषाढी वारीमध्ये संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांसोबत राज्याच्या




विविध भागांतून लाखो वारकरी सहभागी होण्याची अपेक्षा आहे. पुणे शहरातून पालखी मार्गक्रमण करत असताना महापालिकेकडून पिण्याचे पाणी, मोबाइल शौचालये, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सेवा, रुग्णवाहिका, आपत्कालीन वैद्यकीय पथके आणि विश्रांती केंद्रांचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

महापालिका प्रशासनाने नागरिकांना पालखी मार्गावरील वाहतूक निर्बंधांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे सांगितले आहे. यंदा प्रथमच राबविण्यात येणाऱ्या पायांच्या मोफत मसाजच्या या उपक्रमामुळे दीर्घ पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

### वाय-फाय आहे पण पाणी नाही? विकासाच्या दाव्यांमागचे कटू वास्तव

देशात आणि राज्यात विकासाची व्याख्या गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलली आहे. शहरांमध्ये स्मार्ट सिग्नल, मोफत वाय–फाय, डिजिटल सेवा, सीसीटीव्ही नेटवर्क, मेट्रो, एक्सप्रेसवे आणि अत्याधुनिक इमारती यांना विकासाचे प्रतीक मानले जाऊ लागले आहे. मात्र, २०२६ च्या उन्हाळ्याने एक अस्वस्थ करणारा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहेजर नागरिकांच्या नळात पाणीच येत नसेल, तर हा विकास नेमका कोणासाठी आहे?

महाराष्ट्रातील अनेक भागांनी २०२६ मध्ये पाणीटंचाईचा तीव्र सामना केला. राज्य सरकारलाच अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला. पुणे आणि पिंपरी–चिंचवडसारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम शहरांमध्येही कमी पर्जन्यमान, धरणांतील घटता पाणीसाठा आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण झाला. हवामानातील बदल, वाढते तापमान आणि अनियमित मान्सून ही केवळ पर्यावरणीय आव्हाने राहिलेली नाहीत; ती आता प्रशासन, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या बनली आहेत.

पुणे शहराला पाणी पुरवणाऱ्या खडकवासला जलसाखळीतील चार धरणांवर लाखो नागरिक अवलंबून आहेत. पावसातील चढ–उतार आणि वाढती मागणी यामुळे दरवर्षी पाणी वापराचे नियोजन हा महत्त्वाचा विषय ठरतो. दुसरीकडे, शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना जलवाहिन्यांमधील गळती, अनधिकृत जोडण्या, भूजलाचा अतिवापर आणि पुनर्वापरित पाण्याचा मर्यादित वापर यांसारख्या प्रश्नांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नाही.

आज अनेक शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणी मोफत वाय–फाय उपलब्ध आहे, परंतु अनेक वस्त्यांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. डिजिटल सुविधा महत्त्वाच्या आहेतच; परंतु त्या मूलभूत नागरी सेवांची जागा घेऊ शकत नाहीत. इंटरनेटशिवाय काही काळ जगता येऊ शकते, पण सुरक्षित पिण्याच्या पाण्याशिवाय नाही. विकासाचा केंद्रबिंदू माणूस असेल, तर त्याच्या सर्वात मूलभूत गरजा प्रथम पूर्ण होणे आवश्यक आहे.

भारताची लोकसंख्या वाढत आहे, शहरीकरण वेगाने होत आहे आणि हवामान बदलाचा परिणाम अधिक तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत जलसंधारण, सांडपाण्याचे पुनर्प्रक्रियन, पावसाच्या पाण्याचे संकलन, गळती नियंत्रण, जललेखापरीक्षण (थरींशऑ ओींवळीं) आणि भूजल पुनर्भरण यांना प्राधान्य देणे अपरिहार्य आहे. केवळ नवीन धरणे बांधून प्रश्न सुटणार नाही; उपलब्ध पाण्याचे वैज्ञानिक आणि कार्यक्षम व्यवस्थापन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

या पार्श्वभूमीवर विकासाचे मोजमाप नव्याने करण्याची वेळ आली आहे. शहरात किती वाय–फाय हॉटस्पॉट आहेत, किती डिजिटल सेवा सुरू झाल्या किंवा किती भव्य प्रकल्प उभे राहिले, यापेक्षा प्रत्येक घरात नियमित, सुरक्षित आणि पुरेसा पाणीपुरवठा होतो का, प्रत्येक नागरिकाला स्वच्छता आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधा मिळतात का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

विकास हा घोषणांमधून नव्हे तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनातून दिसला पाहिजे. नळ कोरडे असताना डिजिटल प्रगतीची भाषा अपुरी वाटते. आधुनिक शहराची खरी ओळख वेगवान इंटरनेटमध्ये नसून, विश्वासार्ह पाणीपुरवठा, सक्षम पायाभूत सुविधा आणि जीवनमान उंचावणाऱ्या सार्वजनिक सेवांमध्ये असते. कारण शेवटी, वाय–फाय हा आधुनिक जीवनाचा भाग असू शकतो; पण पाणी हा जीवनाचा आधार आहे. विकासाचा पाया डिजिटल नसून मानवी गरजांवर उभा असला पाहिजे.

# आमदार शंकर जगताप यांच्या हस्तक्षेपानंतर महापालिकेची माघार; कचरा निर्णयावर प्रशासनाची घाई अंगाशी?

### मोठ्या सोसायट्यांच्या कचरा प्रश्नावर प्रशासनाला यू–टर्न घ्यावा लागला; – आमदार शंकर जगताप यांच्या पत्रानंतर दंडात्मक कारवाईला ब्रेक; लाखो सोसायटीधारकांना तात्पुरता दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** – शहरातील दररोज १०० किलोहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्या, मंगल कार्यालये, वसतीगृहे, कंपन्या, कॅन्टीन आणि खाणावळींनी आपल्या आवारातच ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावली नाही, तर १ जुलैपासून त्यांचा कचरा उचलला जाणार नाही, शिवाय दंडात्मक आणि फौजदारी कारवाई केली जाईल, असा कठोर इशारा पिंपरी–चिंचवड महापालिकेने दिला होता. मात्र, या निर्णयाविरोधात नागरिक आणि सोसायटीधारकांचा तीव्र विरोध उसळल्यानंतर अखेर प्रशासनाला माघार घ्यावी लागली.

या निर्णयाविरोधात चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी महापालिका आयुक्तांना पत्र पाठवून प्रशासनाच्या भूमिकेवर आक्षेप घेत तातडीने कारवाई स्थगित करण्याची मागणी केली होती. नागरिकांच्या भावना आणि वाढता विरोध लक्षात घेता महापालिकेने अखेर आपली भूमिका बदलत सोसायट्यांचा ओला कचरा तूर्तास पूर्ववत उचलण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या २७ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार दररोज १०० किलोहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या किंवा २० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या आस्थापनांनी त्यांच्या आवारातच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. मात्र, या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक सुविधा, मार्गदर्शन आणि नियोजन न करता



महापालिकेने थेट कारवाईची भूमिका घेतल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि संताप निर्माण झाला.

आमदार शंकर जगताप यांनी १८ जून रोजी आयुक्तांना पत्र पाठवून अनेक गृहनिर्माण संस्थांकडे आवश्यक तांत्रिक सुविधा, आर्थिक क्षमता आणि माहिती उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आणून दिले. अशा परिस्थितीत थेट दंडात्मक कारवाई करणे अन्यायकारक ठरेल, असे त्यांनी स्पष्ट करत प्रशासनाने संबंधित घटकांशी चर्चा करून व्यावहारिक धोरण आखावे, अशी मागणी केली होती.

> अनेक गृहनिर्माण संस्थांकडे आवश्यक तांत्रिक सुविधा, पुरेशी माहिती आणि आर्थिक तरतूद उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत थेट दंडात्मक किंवा फौजदारी कारवाई करणे योग्य ठरणार नाही. नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन महापालिकेने घेतलेल्या माघारीच्या निर्णयाचे स्वागत आहे. मात्र, कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधित घटकांची संयुक्त बैठक घेऊन स्पष्ट मार्गदर्शक सूचना आणि अंमलबजावणीसाठी पुरेसा व व्यावहारिक कालावधी देणे आवश्यक आहे.
>
> **- आमदार शंकर जगताप**

नागरिकांचा वाढता विरोध आणि लोकप्रतिनिधींच्या दबावानंतर महापालिकेने अखेर माघार घेतली. शहरातील सुमारे १,१९५ मोठ्या आस्थापनांचे सर्वेक्षण सुरू असून, पहिल्या टप्प्यात आवश्यक प्रक्रिया यंत्रणा उपलब्ध असलेल्या सोसायट्यांवरच लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या नियमांनुसार आणि न्यायालयाच्या निर्देशांमुळे हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, नागरिकांचा विरोध लक्षात घेता सध्या ओला कचरा पूर्ववत उचलण्यात येणार असून, पुढील निर्णय लोकप्रतिनिधी आणि संबंधित घटकांशी चर्चा करूनच घेतला जाईल.

या घडामोडींमुळे महापालिकेच्या नियोजनशून्य निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, योग्य पूर्वतयारी आणि जनजागृती न करता घेतलेल्या निर्णयामुळे प्रशासनाला अखेर माघार घ्यावी लागल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.



यावेळी बोलताना महापौर रवि लांडगे म्हणाले, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सलग अकरा वर्षे कार्य करण्याचा मान मिळविणारे वसंतराव नाईक हे दूरदृष्टी असलेले मुत्सद्दी राजकारणी होते. शेती, ग्रामीण विकास आणि हरित क्रांतीच्या माध्यमातून त्यांनी राज्याच्या विकासाला नवी दिशा दिली.

या कार्यक्रमाला उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, उपआयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, विविध मान्यवर आणि महापालिकेचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी दिवंगत वसंतराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विकासाभिमुख, लोककल्याणकारी आणि शेतकरीहिताच्या विचारांचा आदर्श समाजाने जपावा, अशी भावना व्यक्त केली.

## पीसीएमसीतील ‘लाईव्ह स्ट्रीमिंग’ बंद केल्याने वाद; घोटाळे लपवण्यासाठीच निर्णय? माजी नगरसेवक मारुती भापकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी–चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतील थेट प्रक्षेपण (live streaming) बंद करण्यात आल्यावरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. हा निर्णय पारदर्शकतेसाठी नव्हे, तर कथित घोटाळे आणि गैरकारभार झाकण्यासाठी घेतल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक मारुती भापकर यांनी केला आहे.

भापकर यांनी या निर्णयावर तीव्र शब्दांत टीका करत भाजपच्या कोअर कमिटीवरही नगरसेवकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणल्याचा आरोप केला आहे. सभागृहातील चर्चा जनतेपर्यंत पोहोचू नये म्हणूनच ‘लाईव्ह स्ट्रीमिंग’ थांबवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. दरम्यान, भाजप नेते प्रशांत शितोळे यांच्या रामभाऊ माळगी प्रबोधिनीतील प्रशिक्षण शिबिराच्या पार्श्वभूमीवरही भापकर यांनी उपरोधिक टीका करत पक्षांतर्गत निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. जर सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण पुन्हा सुरू करण्यात आले नाही, तर जनआंदोलन छेडण्याचा इशाराही भापकर यांनी दिला आहे. या घडामोडीमुळे महापालिकेतील पारदर्शकता, निर्णयप्रक्रिया आणि राजकीय नियंत्रण यावर नव्याने वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# पहिल्याच तिमाहीत पिंपरी–चिंचवड महापालिकेचा विक्रमी मालमत्ता कर; ५२६ कोटींची वसुली

- ■ ४ लाख ४५ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी भरला कर
- ■ ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या सर्वाधिक; सवलत योजनांना उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** – पिंपरी–चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत मालमत्ता कर वसुलीत विक्रमी कामगिरी करत ५२६ कोटी १४ लाख रुपयांचा कर जमा केला आहे. अवघ्या तीन महिन्यांत ही विक्रमी वसुली झाली असून, शहरातील ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्तांपैकी ४ लाख ४५ हजार ६२० मालमत्ताधारकांनी कर भरत विविध सवलत योजनांचा लाभ घेतला आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महापौर रवि लांडगे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी करदात्यांचे आभार मानत, नागरिकांनी वेळेत कर भरून महापालिकेच्या विकासकामांना सहकार्य केल्याचे सांगितले.

महापालिकेने यंदा कर भरण्यासाठी विविध जनजागृती मोहिमा राबविल्या. मालमत्ता करावरील सवलतींची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. तसेच, महिला बचत गटांच्या माध्यमातून घरपोच कर बिले वितरित करण्यात आल्याने नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर वेळेत कर भरला. पहिल्या तिमाहीत कर भरणाऱ्या ४ लाख ४५ हजार ६२० मालमत्ताधारकांपैकी तब्बल ३ लाख ४७ हजार ५६४ नागरिकांनी ऑनलाइन माध्यमातून कर भरून सवलतींचा लाभ घेतला. त्यामुळे डिजिटल व्यवहारांनाही मोठी चालना मिळाल्याचे महापालिकेने नमूद केले. महापालिकेच्या इतिहासात ३० जूनपर्यंत एवढ्या मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराची वसुली प्रथमच झाल्याची माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली. महापालिकेच्या सवलत योजना, जनजागृती आणि डिजिटल कर भरणा सुविधांमुळे यंदा पहिल्याच तिमाहीत मालमत्ता कर संकलनात ऐतिहासिक विक्रम नोंदविण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**कर संकलनाचा तपशील**

- ✻ ऑनलाइन: ४०७ कोटी ८९ लाख रुपये
- ✻ रोख: २१ कोटी ४७ लाख रुपये
- ✻ धनादेशाद्वारे : १६ कोटी २४ लाख रुपये
- ✻ डिमांड ड्राफ्ट (): १५ कोटी ७५ लाख रुपये
- ✻ विविध मोबाईल ॲपद्वारे : १० कोटी ४५ लाख रुपये



# गोनवडी येथे स्मशानभूमीजवळ गावठी हातभट्टी दारू विक्रीवर पोलिसांचा छापा; एक जण गजाआड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी स्मशानभूमीसारख्या दुर्गम भागात गावठी हातभट्टी दारू तयार करून विकणाऱ्या एका ४८ वर्षीय इसमाला उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे.

जीवान मारुती राजपूत (वय ४८ वर्षे, रा. गोनवडी, ता. खेड, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस नाईक मंगेश देवराम कदम यांनी उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

३० जून रोजी दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास खेड तालुक्यातील गोनवडी गावच्या हद्दीतील नदीच्या कडेला, स्मशानभूमी जवळ असलेल्या मोकळ्या जागेत आरोपी जीवान राजपूत हा बेकायदेशीररित्या गावठी दारू विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाड टाकून १७ लीटर गावठी हातभट्टी दारू आणि ती तयार करण्याचे साहित्य असा एकूण १,७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्यावर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार होले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

बातमी ४: भांबोली येथे दोस्ती चायनीज हॉटेलमागे अवैध दारू विक्री; उत्तर म्हाळुंगे पोलिसांकडून आरोपीला बेड्या

पिंपरी चिंचवड (प्रतिनिधी): खेड तालुक्यातील भांबोली येथे बेकायदेशीर आणि विनापरवाना देशी दारूची विक्री करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणाला उत्तर म्हाळुंगे पोलिसांनी रंगेहात अटक केली आहे. पोलिसांनी कारवाई दरम्यान ५ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

विश्वजीत बिपीन कुमार महिलांगे (वय १९ वर्षे, रा. भांबोली गाव, ता. खेड, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई रामहरी महादेव शिंदे यांनी उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २९ जून रोजी रात्री १०:३० वाजताच्या सुमारास भांबोली गावच्या हद्दीत 'दोस्ती चायनीज' हॉटेलच्या उजव्या बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत आरोपी विश्वजीत महिलांगे हा बेकायदेशीररित्या दारूची विक्री करत होता. पोलिसांनी छापा टाकून त्याच्याकडून 'देशी दारू पॉवर'चे १८० मिली मापाच्या ५१ बाटल्या आणि ९० मिली मापाच्या ३७ बाटल्या असा एकूण ५,५६० रुपये किमतीचा प्रोव्हीबीशन माल जप्त केला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली असून, पोलीस नाईक जुंदरे पुढील तपास करत आहेत.

बातमी ३: म्हाळुंगे एमआयडीसी पोलिसांची कारवाई; महिंद्रा सर्कलजवळ २५ हजारांच्या पिस्तुलसह तरुण जेरबंद

पिंपरी चिंचवड (प्रतिनिधी): म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर शस्त्र बाळगून फिरणाऱ्या एका २३ वर्षीय तरुणाला पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. त्याच्याकडून २५ हजार ५०० रुपये किमतीचा एक देशी बनावटीचा गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे.

शेखर पोपट तांबे (वय २३ वर्षे, रा. सद्याचा पत्ता: तांबेवाडी, वरुडे, ता. खेड, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई प्रशांत जयंत कसबे यांनी म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जून रोजी रात्री ७:१५ वाजताच्या सुमारास म्हाळुंगे गावच्या हद्दीत महिंद्रा सर्कल जवळील पूजा हॉटेल समोर आरोपी शेखर तांबे हा संशयास्पदरित्या फिरत होता. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे विनापरवाना देशी बनावटीचा कट्टा आणि एक जिवंत काडतूस मिळून आले.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने लागू करण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी आरोपीवर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस हवालदार रेगडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# भाजप नगरसेवकांना पक्षशिस्तीचा ‘डोस’; स्वतंत्र भूमिका घेतल्यास कारवाईचा इशारा

### महापालिकेत ‘व्हिप’ अधिक कडक; विरोधी भूमिका मांडणाऱ्यांवर शिस्तभंगाची टांगती तलवार; मुंबईतील प्रशिक्षण शिबिरात उपस्थिती अनिवार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** – पिंपरी–चिंचवड महापालिकेतील भाजप नगरसेवकांमध्ये वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर पक्षाने आता पक्षशिस्त अधिक कडक करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या अधिकृत भूमिकेपासून विचलित होणाऱ्या किंवा स्वतंत्र भूमिका घेणाऱ्या नगरसेवकांवर कठोर पक्षांतर्गत कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिला आहे.

भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पक्षशिस्तीचा मुद्दा केंद्रस्थानी राहिला. काही नगरसेवकांकडून पक्षाच्या भूमिकेपेक्षा वेगळी भूमिका घेतली जात असल्याबाबत वरिष्ठ नेतृत्वाने नाराजी व्यक्त केल्याचे शितोळे यांनी सांगितले. यापुढे अशा प्रकाराला कोणतीही सवलत दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रत्येक नगरसेवकाने पक्षाने ठरविलेल्या भूमिकेनुसारच मतदान करावे आणि अधिकृत भूमिका मांडावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. पदाधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या विरोधात जाणे, सभागृहात वेगळी भूमिका घेणे किंवा माध्यमांसमोर पक्षाच्या भूमिकेशी विसंगत वक्तव्य करणे हे पक्षशिस्तीचे उल्लंघन मानले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. पक्षशिस्त मोडणाऱ्यांवर टप्प्याटप्प्याने कारवाई केली जाईल. गरज पडल्यास संबंधित नगरसेवकांविरोधात पक्षश्रेष्ठींकडे तक्रार पाठविणे, पदावरील जबाबदाऱ्या काढून घेणे तसेच शिस्तभंगाची पुढील कारवाई करण्याचे संकेतही शितोळे यांनी दिले. या घडामोडींमुळे महापालिकेतील भाजपमध्ये अंतर्गत मतभेद वाढत असल्याची चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे. नगरसेवकांकडून स्वतंत्र भूमिका मांडली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर पक्ष नेतृत्वाने आता कडक शिस्तीचा मार्ग स्वीकारल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, नगरसेवकांना सभागृहाचे कामकाज, अधिकार, जबाबदाऱ्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमांची माहिती देण्यासाठी १० ते १२ जुलै २०२६ या कालावधीत मुंबई येथे रामभाऊ माळगी प्रबोधिनीच्या माध्यमातून विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सर्व नगरसेवकांनी या शिबिरात अनिवार्यपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही पक्षाकडून करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# अवघ्या काही तासांच्या पावसाने चाकण ठप्प..! पुणे-नाशिक महामार्गाला 'नदीचे स्वरूप'; नेमके चुकले कुठे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** मागील अनेक दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने रविवारी (दि. २८) चाकण शहरासह संपूर्ण परिसराला अक्षरशः झोडपून काढले. दुपारनंतर अचानक आकाशात काळे ढग दाटून आले आणि ढगांच्या गडगडाटासह विजांच्या कडकडाटात मुसळधार पावसाने दमदार हजेरी लावली. अवघ्या काही वेळातच रस्ते जलमय झाले, तर सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. या मुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका पुणे-नाशिक महामार्गाला बसला.

महामार्गावरील पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी उभारण्यात आलेली गटार लाईन चुकीच्या पद्धतीने आणि निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. पाण्याचा निचरा न झाल्याने महामार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले आणि काही काळ महामार्गाला अक्षरशः नदीचे स्वरूप प्राप्त झाले. तर लगतच्या व्यावसायिकांना याचा मोठा फटका सहन करावा लागला. महामार्गावरील पाण्यामुळे दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अनेक वाहनांचा वेग मंदावला, तर काही दुचाकी पाण्यात बंद पडल्याच्या घटना घडल्या. पाण्याचा अंदाज न आल्याने वाहनचालकांना अत्यंत सावधपणे मार्ग काढावा लागला. त्यामुळे काही ठिकाणी वाहतूक संथ गतीने सुरू होती.



पावसाळ्यापूर्वी चाकण नगर परिषदेकडून शहरातील नाले, गटारे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांची साफसफाई पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, आज झालेल्या मुसळधार पावसाने या दाव्याची वास्तवस्थिती समोर आणली. अवघ्या काही तासांच्या पावसात शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याने नगर परिषदेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्यामुळे मुख्य रस्ते, अंतर्गत गल्लीबोळ तसेच काही चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले. त्यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना मोठी कसरत करावी लागली, तर पादचाऱ्यांनाही पाण्यातून मार्ग काढावा लागला.

दरम्यान, या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. खरीप हंगामातील पिकांना या पावसाचा मोठा फायदा होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, शहरातील पाणी निचऱ्याच्या अपुऱ्या आणि सदोष व्यवस्थेमुळे प्रत्येक पावसात नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने संबंधित प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## सारांश वृत्त

### लोणीकंद पोलिसांनी गुन्हेगारी टोळीच्या आवळल्या मुसक्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोरेगाव भीमा :** लोणीकंद येथे नाकाबंदी दरम्यान एका संशयित कारची झडती घेतली असता त्यात पिस्टल आणि तीन जिवंत काडतुसे आढळून आली. याप्रकरणी तिघांना ताब्यात घेण्यात आले असून लोणीकंद पोलिस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनीता रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली लोणीकंद पोलिस स्टेशन समोर पुणे-नगर रस्त्यावर नाकाबंदी लावण्यात आली होती. या नाकाबंदी दरम्यान सायंकाळी पाचच्या सुमारास एक पांढरे रंगाचे ग्लांझा कार ब्लॅक फिल्मिंग केलेली वाघोलीकडून नगरच्या दिशेने जाताना दिसली. त्यामुळे पोलिस हवालदार स्वप्नील जाधव, पोलिस अंमलदार सुधीर शिवले आणि पोलिस अंमलदार मल्हारी सपुरे यांनी सदर कारला रस्त्याच्या बाजूला नेण्याचा इशारा केला. परंतु सदर कार वेगाने निघून जाऊ लागल्याने नाकाबंदी करणारे इतर पोलिस अधिकारी आणि पोलिस अंमलदार यांच्या मदतीने सदर कार थांबवली.

त्यावेळी सदर कारमध्ये मकोका व खुनाच्या गुन्ह्यातील पोलिस रेकॉर्डवरील आरोपी रोहन ऋषिकेश गायकवाड (वय २२, रा. लोणीकंद, ता. हवेली) अभिषेक भानुदास लंघे (वय २५, रा. करडे, ता. शिरूर) विशाल उद्धव झोडगे (वय २२, रा. कासारी, ता. शिरूर) मिळाले. त्यावेळी दोन पंचांसमक्ष नमूद आरोपी व्यक्तींची व कारची झडती घेतली असता कारमध्ये ३०,००० रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्टल व ६००० रुपये किमतीचे ३ जिवंत काडतुसे व ६,००,००० रुपये किमतीची कार असा एकूण ६ लाख ३६००० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळाला. त्यानुसार त्यांना अटक करण्यात आली आहे.

### टॅक्सी चालकाला मारहाण; नेमकं कारण काय?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** कायद्याचे पालन करवून घेण्याची जबाबदारी असलेल्या काही पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांना कायद्याचाच विसर पडल्याचे दिसून येत आहे. थेट भररस्त्यात एका टॅक्सी चालकाला मारहाण केल्याचा प्रकार काळेवाडी फाटा परिसरात घडला आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडीओमध्ये एक पोलिस अधिकारी भर चौकात एका टॅक्सी चालकाला धक्काबुक्की करत मारहाण करताना दिसत आहे.

# महात्मा फुले वाड्यात वटपौर्णिमा साजरी करण्यावरून निर्माण झालेला वाद सामाजिक संवेदनशीलतेकडे दुर्लक्ष की जाणीवपूर्वक राजकीय प्रक्षोभ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील महात्मा ज्योतिराव फुले वाडा या ऐतिहासिक व वैचारिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी वटपौर्णिमेसारखा पारंपरिक धार्मिक विधी साजरा केल्यामुळे पुन्हा एकदा गंभीर वाद निर्माण झाला आहे. या घटनेमुळे केवळ धार्मिक भावना नव्हे, तर सामाजिक इतिहास आणि प्रतीकात्मकतेचा स्पष्ट अपमान केल्याचा आरोप होत आहे.

फुले वाडा हे केवळ एक वास्तू नसून ते समता, अंधश्रद्धा विरोध आणि सामाजिक सुधारणांच्या चळवळीचे जिवंत प्रतीक मानले जाते. अशा ठिकाणी पारंपरिक धार्मिक विधी आयोजित करणे हे काहींना फुले यांच्या वैचारिक वारशाशी उघड विरोधात जाणारे आणि त्याचे विकृतीकरण करणारे वाटते.

या पार्श्वभूमीवर बहुजन संघटनांचा तीव्र विरोध अपेक्षितच मानला जात आहे. त्यांच्या मते, अशा कृतींमुळे सामाजिक संघर्ष वाढतो आणि ऐतिहासिक स्थळांचा राजकीय किंवा सांस्कृतिक अजेंडा साधण्यासाठी वापर केला जातो.

या प्रकरणातून पुन्हा एकदा हा प्रश्न उभा राहतो की ऐतिहासिक आणि वैचारिक वारसा असलेल्या स्थळांवर कोणत्या मर्यादेत सार्वजनिक किंवा धार्मिक कार्यक्रमांना परवानगी द्यावीआणि अशा निर्णयांमध्ये संवेदनशीलता दाखवली जाते का, की जाणूनबुजून तणाव निर्माण केला जातो?

# पुणे-नाशिक महामार्गावरील बिरदवडीकडे जाणाऱ्या चौकात 'मृत्यूचा खड्डा'; वाहनचालकांचा जीव टांगणीला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** चाकण-तळेगाव महामार्गास हऔद्योगिक क्षेत्रातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पर्यायी मार्ग म्हणून वापरला जाणारा महाळुंगे-बिरदवडी मार्ग सध्या एका धोकादायक खड्ड्यामुळे चर्चेत आला आहे. पुणे नाशिक मार्गावरील रोहकल फाट्याजवळ रस्त्याच्या मध्यभागी ड्रेनेज चेंबरच्या मोठ्या खड्ड्यामुळे वाहनचालकांचा जीव धोक्यात आला असून, नागरिकांनी या खड्ड्याला 'मृत्यूचा खड्डा' अशी उपमा दिली आहे.

मुंबई, तळेगाव, चाकण आणि औद्योगिक परिसरातून नाशिककडे जाणाऱ्या वाहनांसाठी हा मार्ग महत्त्वाचा मानला जातो. दिवसभर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. मात्र, रस्त्याच्या मध्यभागी पडलेल्या खड्ड्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ड्रेनेज चेंबरजवळील हा खड्डा कायम असून पावसामुळे त्याचा आकार दिवसेंदिवस वाढत आहे. दुचाकीस्वार आणि चारचाकी चालकांना अचानक हा खड्डा न दिसल्यास मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि पावसात खड्डा दिसत नसल्याने धोका अधिक वाढला आहे. अनेक वाहनचालकांना अचानक ब्रेक लावावे लागत असल्याने किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

**तातडीने दुरुस्ती करावी**

या समस्येबाबत औद्योगिक क्षेत्रातील कामगार, व्यावसायिक आणि ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस दुरुस्ती करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. केवळ पाहणी आणि आश्वासनांवर वेळ न घालवता तातडीने दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी होत आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या खड्ड्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# पुणे–नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मंजूर मूळ मार्ग बदलण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** वीस वर्षांच्या संपूर्ण प्रक्रियेत GMRT हा अडथळा कधीच नव्हता. मंजुरी मिळाल्यानंतर अचानक हा मुद्दा पुढे करून मूळ मार्ग बदलण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्यामागील कारणांची गंभीर चौकशी होणे आवश्यक आहे.



त्यांनी पुढे सांगितले की, GMRT संदर्भातील सर्व तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करूनच भूमिका मांडण्यात आली आहे. रेल्वे मार्गामुळे GMRTच्या कार्यक्षमतेवर किंवा संशोधनावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे तांत्रिकदृष्ट्या स्पष्ट असून, केवळ या कारणाचा आधार घेऊन प्रकल्पाचा मार्ग बदलण्याचा प्रयत्न वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीत उपस्थित सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनीही मूळ मार्ग बदलल्यास हजारो कोटी रुपयांच्या विकासक्षमतेवर परिणाम होईल, अशी चिंता व्यक्त केली. चाकण औद्योगिक वसाहत, राजगुरूनगर, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, संगमनेर आणि सिन्नरसह संपूर्ण पट्ट्याच्या औद्योगिक, कृषी, व्यापारी आणि शैक्षणिक विकासासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

बैठकीत पुढील लढ्याची रणनीतीही निश्चित करण्यात आली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असून, मूळ मार्ग कायम ठेवण्याची ठाम मागणी करणार आहे. त्यानंतर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्लीत भेट घेऊन मंजूर आराखड्यात कोणताही बदल न करण्याची भूमिका मांडण्यात येणार आहे.

या बैठकीस मंत्री तथा आमदार दिलीपराव वळसे पाटील (व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे), मंत्री तथा आमदार माणिकराव कोकाटे, आमदार बाबाजी काळे, सत्यजित तांबे, शरद सोनवणे, विठ्ठलराव लंघे पाटील, प्राजक्त तनपुरे, अमोल खताळ आणि अक्षय कर्डिले उपस्थित होते.

बैठकीअखेर सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी स्पष्ट इशारा दिला की, पुणे–नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मंजूर मूळ मार्ग बदलण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. लाखो नागरिकांच्या हिताशी निगडित असलेल्या या प्रकल्पासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे संयुक्तपणे व अधिक आक्रमकपणे पाठपुरावा करण्यात येईल.

# मंचरमध्ये निष्ठावंत शिवसैनिकांचा गद्दारांविरोधात संताप; उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर व्यक्त केला ठाम विश्वास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाशी गद्दारी करून सत्तेच्या मोहापायी दुसऱ्या गटात गेलेल्या नेत्यांविरोधात मंचर येथे बुधवारी निष्ठावंत शिवसैनिकांनी जोरदार निषेध आंदोलन केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या आंदोलनात गद्दारांविरोधात घोषणाबाजी करत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला. कोणत्याही परिस्थितीत उद्धवसाहेबांसोबतच राहणार, असा निर्धार उपस्थित शिवसैनिकांनी व्यक्त केला.

या आंदोलनाचे नेतृत्व कट्टर शिवसैनिक प्रा. डॉ. अनिल निघोट यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांवर कठोर टीका केली. शिवसेनेने सर्वसामान्य कार्यकर्त्यांना पद, प्रतिष्ठा आणि राजकीय ओळख दिली. मात्र, त्याच पक्षाशी विश्वासघात करून सत्तेच्या लालसेपोटी गद्दारी करणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही, असे त्यांनी सांगितले.

प्रा. डॉ. निघोट यांनी आरोप केला की, काही नेते जनतेच्या हितासाठी नव्हे, तर स्वतःवरील चौकशा, भ्रष्टाचाराचे आरोप आणि गैरमार्गाने जमविलेली संपत्ती वाचविण्यासाठी सत्तेचा आधार घेत आहेत. मात्र, आंबेगाव तालुक्यात शिवसेनेचा भगवा झेंडा निष्ठावंत शिवसैनिकांच्या हातातच कायम फडकत राहील आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाशी आमची नाळ कधीही तुटणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आंदोलनादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर शिवसेनेच्या घोषणांनी दणाणून गेला. उपस्थित शिवसैनिकांनी गद्दारांचा निषेध करत पक्षनिष्ठा जपण्याची शपथ घेतली.

या आंदोलनात शाखाप्रमुख ज्ञानेश्वर राऊत, माजी शहरप्रमुख राहुल कोंडे, शंकर भैय्ये, किसन भैय्ये, ह.भ.प. शंकर डोकडे, अशोक गुंजाळ, शंकर गायकवाड, राजू मैड, माजी सरपंच बुधाजी गायकवाड, माजी सरपंच सोपान निघोट, अनिल शंकर निघोट, गोरख निघोट, जालिंदर घुले, प्रकाश जाधव, साहेबराव ननावरे, बबन काळे, अशोक निघोट, प्रल्हाद नेवासकर यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी, शिवसैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# आळंदीत आषाढी वारी पालखी सोहळा हरिनाम गजरात प्रारंभ

## धार्मिक परंपरा, प्रशासनाची तयारी आणि भाविकांसाठी सुविधा देण्यावर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात आषाढी वारी पालखी सोहळा सन २०२६ अंतर्गत सप्ताहाचा प्रारंभ हरिनाम गजरात करण्यात आला. व्यवस्थापक माऊली वीर यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा सप्ताह १ ते ८ जुलै दरम्यान मंदिरात साजरा होत असून दररोज सायंकाळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कालावधीत सायंकाळी ४ ते ५ या वेळेत प्रवचन आणि सायंकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत कीर्तन सेवा होणार आहे. राज्यातील विविध मान्यवर प्रवचनकार आणि कीर्तनकार यामध्ये सहभागी होणार असून वारकरी संप्रदायाची परंपरा आणि अध्यात्मिक विचारांचा प्रसार केला जाणार आहे.

सप्ताहाचा प्रारंभ पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांच्या हस्ते पूजा करून करण्यात आला. यावेळी विश्वस्त, व्यवस्थापक, पुजारी आणि मानकरी उपस्थित होते. वेदमंत्र घोष आणि हरिनाम गजरात धार्मिक वातावरणात कार्यक्रमाची सुरुवात झाली.

दरम्यान, आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी रथ ओढण्यासाठी मानाच्या बैलजोडींची पूजा आणि पाहणी करण्यात आली. या प्रसंगी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते. ही परंपरा वारकरी सोहळ्याच्या सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्वाचा भाग मानली जाते. या वर्षी पालखी सोहळ्यासाठी सुमारे ३० लाख रुपये खर्च करून नवीन, हलका आणि सुशोभित रथ तयार करण्यात येत आहे. जुन्या रथाच्या तुलनेत हा रथ सुमारे एक टनाने हलका असल्याने बैलजोडींसाठी तो ओढणे अधिक सुलभ होणार आहे. रथावर पारंपरिक नक्षीकाम आणि देवदेवतांची कलात्मक मांडणी करण्यात आली आहे.



दुसरीकडे, आळंदी बस स्थानक परिसरात पावसामुळे चिखल आणि अस्वच्छतेची समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे भाविकांच्या सोयीसाठी स्वच्छता, पिण्याचे पाणी, निवारा शेड आणि प्रकाश व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची मागणी स्थानिक पातळीवर करण्यात आली आहे.

एकूणच, आळंदीतील पालखी सोहळा हा केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून, तो प्रशासन, स्थानिक संस्था आणि समाज यांच्या समन्वयातून भाविकांसाठी अधिक सुव्यवस्थित आणि सुरक्षित करण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते.

## सारांश वृत्त

### पाऊस लांबला, शेतीची कामे रखडली, बळीराजा म्हणतोय, 'वारी चुकू न दे हरी'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** अधिक महिन्यामुळे यंदाची आषाढीवारी लांबणीवर पडली आहे. त्यातच पावसानेही ओढ दिली आहे. परिणामी वारीतील वारकऱ्यांच्या संख्येवर परिणाम होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निष्ठावंत वारकरी मात्र सहभागी होतीलच, असा आशावाद संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम देवस्थानांनी व्यक्त केला आहे. बळीराजाही 'वारी चुकू न दे हरी...' अशी आर्त विनवणी पांडुरंगाकडे करू लागला आहे. दरवर्षी जूनमध्ये देहू आणि आळंदीतून पढरपूरपर्यंत आषाढी वारी होत असते. मात्र, यंदा अधिक महिना असल्याने वारी जुलै महिन्यात आली आहे. संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान ७ जुलैला श्रीक्षेत्र देहूगाव येथून, तर ८ जुलैला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान आळंदी येथून होणार आहे. सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

जुलै उजाडला तरी अजून समाधानकारक पाऊस पडलेला नाही. पुणे जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अधिक असते. मात्र, अद्याप जोरदार पाऊस सुरू न झाल्याने शेतीसह पिण्याच्या पाण्याची चिंता आहे. वारीमध्ये विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या भागातून दिंड्या सहभागी होत असतात. पेरणीची कामे उरकून सहभागी होणाऱ्या बळीराजाचे प्रमाण अधिक असते.

अजून मराठवाडा, तसेच इतर भागांमध्ये पावसाला सुरुवातही झालेली नाही. पेरणीची कामे पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे यंदाच्या वारीवर परिणाम होणार असल्याचे दिसून येत आहे.

# पेसा मोबिलायझर आंदोलनाला तात्पुरती स्थगिती; मंत्रालयातील चर्चेनंतर संघर्ष पुढे ढकलला

## आझाद मैदानातील बेमुदत आंदोलन तूर्त स्थगित; मात्र संघर्ष कायम राहणार असल्याचा इशारा; मंत्रीस्तरीय चर्चेनंतर १५ जुलैला मंत्रालयात निर्णायक बैठक होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई, आझाद मैदान :** पेसा मोबिलायझर पदे कमी करू नयेत या प्रमुख मागणीसाठी आझाद मैदानात सुरू असलेले बेमुदत धरणे आंदोलन अखेर मंत्रीस्तरीय चर्चेनंतर तूर्तास स्थगित करण्यात आले. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासोबत स्वतंत्रपणे झालेल्या चर्चेनंतर पुढील वाटाघाटीचा मार्ग मोकळा झाल्याचे स्पष्ट झाले.

भर पावसात दिवसभर सुरू असलेल्या या आंदोलनात हजारो पेसा मोबिलायझर सहभागी झाले होते. मात्र, आंदोलनाचा ताण आणि वाढता दबाव लक्षात घेता संघर्ष समितीने तात्पुरती माघार घेत आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

बैठकीत पेसा मोबिलायझर पदे कमी न करण्याच्या मागणीवर सकारात्मक चर्चा झाल्याचा दावा करण्यात आला. यानंतर १५ जुलै रोजी मंत्रालयात पुन्हा सविस्तर बैठक घेण्याचे ठरले असून, या बैठकीला दोन्ही मंत्री तसेच ग्रामविकास व आदिवासी विकास विभागांचे प्रधान सचिव उपस्थित राहणार आहेत. या घडामोडींनंतरही आंदोलकांनी संघर्ष संपलेला नसून





फक्त स्थगित केला असल्याचे स्पष्ट केले आहे. भर पावसातही राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, नंदुरबार, धुळे, नाशिक, ठाणे, पालघर, पुणे आणि अहिल्यानगर यांसह १३ आदिवासी बहुल जिल्ह्यांतील आंदोलकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत सरकारवर दबाव कायम ठेवला. आंदोलनाच्या समारोपावेळी कॉ. मरियम ढवळे, डॉ. अजित नवले, आमदार विनोद निकोले, डॉ. अमोल वाघमारे आणि कॉ. आयआरटी इराणी यांनी मनोगत व्यक्त करत सरकारच्या भूमिकेकडे लक्ष वेधले. पदे कमी करण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. तूर्तास आंदोलन स्थगित झाले असले तरी सरकार आणि आंदोलकांमधील संघर्ष अद्याप संपलेला नसून पुढील बैठक निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# मिसिंग लिंकमध्ये धावत्या मोटारीवर दगड कोसळला; चालकाच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** कोट्यवधी रुपयांचा खर्च करून नुकताच वाहतुकीसाठी खुल्या करण्यात आलेल्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील मिसिंग लिंक प्रकल्पाच्या सुरक्षिततेवर पहिल्याच पावसात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कनेक्टिंग लिंक बोगद्यात धावत्या मोटारीवर अचानक दगड कोसळून समोरील काच फुटल्याची घटना सोमवारी घडली. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. चालकाच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला. सोमवारी सायंकाळी ५.१७ वाजण्याच्या सुमारास बोगदा क्रमांक २ (पुणे लेन) मधून मोटार (एमएच ४६ सीएम १९८९) पुण्याच्या दिशेने जात असताना बोगद्याच्या भागातून अचानक दगड कोसळला. दगड थेट मोटारीच्या समोरील काचेवर आदळल्याने काच पूर्णपणे फुटली. चालकाने प्रसंगावधान राखल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले नाही आणि मोठा अनर्थ टळला. विशेष म्हणजे, हा मार्ग अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेची हमी देत नुकताच सुरू करण्यात आला आहे. अशा




परिस्थितीत बोगद्यामध्येच दगड कोसळण्याची घटना घडल्याने कामाच्या दर्जाबाबत आणि देखभाल व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

घटनेची माहिती मिळताच खंडाळा महामार्ग पोलीस केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक समीर कटपाळे व एमएसएफ जवान सुरेश ढेरे यांनी घटनास्थळी भेट दिली.

अवाढव्य खर्च करून उभारलेल्या प्रकल्पात जर पहिल्याच पावसात दगड कोसळत असतील, तर उद्या एखादा मोठा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? बोगदे, डोंगरकडे आणि संरक्षण जाळ्यांची नियमित तपासणी होत आहे का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. या घटनेची चौकशी करून मिसिंग लिंक मार्गावरील सर्व बोगदे व डोंगरउतारांचे तातडीने सुरक्षा ऑडिट करून प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

# अमेरिकेतील जन्माधारित नागरिकत्व निर्णय: भारतीय कुटुंबांसाठी वास्तव, मर्यादा आणि भ्रमनिरास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने जन्माधारित नागरिकत्व **(birthright citizenship)** संदर्भातील वादात संविधानातील १४व्या दुरुस्तीचा पुनरुच्चार करून तात्पुरत्या व्हिसाधारकांच्या मुलांचे नागरिकत्व काढून घेण्याचा प्रयत्न फेटाळून लावला आहे. वरवर पाहता हा निर्णय स्थिरता देणारा वाटतो, पण त्यामागील सामाजिक आणि राजकीय वास्तव अधिक गुंतागुंतीचे आहे.

भारतीय **H-1B, L-1** आणि **F-1** व्हिसाधारक कुटुंबांसाठी हा निर्णय दिलासा देणारा मानला जातो, कारण अमेरिकेत जन्मलेल्या मुलांचे नागरिकत्व अबाधित राहते. मात्र ही सुरक्षा पूर्णतः नैतिक किंवा मानवी हक्कांवर आधारित आहे असे मानणे चुकीचे ठरेल. अमेरिकेतील नागरिकत्व धोरण हे कायमच राजकीय वादाचे साधन राहिले आहे आणि भविष्यातही ते पुन्हा लक्ष्य केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या निर्णयामुळे एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित होतो - अमेरिकेतील स्थलांतरित कुटुंबांचे आयुष्य अजूनही अनिश्चिततेच्या सावलीत आहे. जरी मुलांना नागरिकत्व मिळत असले तरी पालकांचे ग्रीन कार्ड प्रलंबित, रोजगार मर्यादित आणि कायदेशीर स्थिती अस्थिर राहते. त्यामुळे अमेरिकन स्वप्न हे अनेक भारतीय कुटुंबांसाठी अद्याप अपूर्णच आहे.

दुसरीकडे, राजकीय पातळीवर बर्थ टुरिझम आणि स्थलांतर नियंत्रण या नावाखाली नागरिकत्व संकल्पनेवर सतत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. हा केवळ कायदेशीर मुद्दा नसून तो ओळख, हक्क आणि राष्ट्रवादाच्या राजकारणाशी जोडलेला आहे.

या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय तात्पुरता दिलासा देतो, पण स्थलांतरित कुटुंबांच्या मूलभूत समस्यांवर तो कोणताही तोडगा देत नाही. उलट, भविष्यातील राजकीय बदलांमुळे हे स्थैर्य पुन्हा धोक्यात येऊ शकते. एकूणच, हा निर्णय दिलासा आणि अनिश्चितता यांच्यात अडकलेली स्थिती निर्माण करतो जिथे कायदेशीर हमी आहे, पण सामाजिक आणि राजकीय सुरक्षितता अजूनही प्रश्नचिन्हाखाली आहे.

# ३० दिवसांच्या अटकेनंतर मुख्यमंत्री–मंत्र्यांना पदावरून हटवण्याच्या विधेयकावरून उठलेला राजकीय वाद

## लोकशाही सुधारणा की सत्ताकेंद्रित धोकादायक शस्त्र?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने प्रस्तावित केलेले संविधान दुरुस्ती विधेयक, ज्यामध्ये पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि मंत्री यांना गंभीर गुन्ह्यांच्या आरोपावर ३० दिवस सलग अटक किंवा कोठडीत राहिल्यास पदावरून दूर करण्याची तरतूद आहे, हे वरवर पाहता राजकीय शुचिता वाढवणारे वाटते. मात्र या विधेयकावरून निर्माण झालेला वाद हा केवळ नैतिकतेचा नसून थेट भारतीय लोकशाहीच्या मूलभूत रचनेशी संबंधित आहे.

या प्रस्तावाचे समर्थक असा दावा करतात की गुन्हेगारी आरोपांखाली असलेल्या व्यक्तींनी सत्तेत राहणे हे जनतेच्या विश्वासाला तडा देणारे आहे. त्यामुळे प्रशासनात पारदर्शकता आणि जबाबदारी वाढेल, असा युक्तिवाद केला जातो. पण या युक्तिवादामागे एक गंभीर प्रश्न दडलेला आहेआरोप आणि दोषसिद्धी यामधील सीमारेषा पुसली जात आहे का?



या विधेयकाचा सर्वात वादग्रस्त भाग म्हणजे दोष सिद्ध न होता, फक्त अटकेच्या आधारे पद गमावण्याची तरतूद. भारतीय न्यायव्यवस्थेत निर्दोष मानण्याचा हक्क हा मूलभूत तत्त्व मानला जातो. अशा स्थितीत ३० दिवसांच्या कोठडीवर आधारित पदच्युती ही न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा प्रशासनिक हस्तक्षेपाला अधिक वाव देऊ शकते, असा विरोधकांचा आरोप आहे.

विरोधक आणि काही कायदे तज्ज्ञांचे म्हणणे आहे की या तरतुदीचा राजकीय गैरवापर होण्याचा धोका मोठा आहे. तपास यंत्रणांचा वापर करून निवडक नेत्यांना अटक करून सरकार बदलण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे हा मुद्दा भ्रष्टाचारविरोधी सुधारणा कमी आणि राजकीय नियंत्रणाचे साधन अधिक बनण्याचा धोका निर्माण करतो.

एकूणच, हे विधेयक केवळ प्रशासनिक सुधारणा नसून सत्तेचे संतुलन, न्यायव्यवस्था आणि लोकशाहीतील स्वायत्तता यावर परिणाम करणारा अत्यंत संवेदनशील विषय बनला आहे.

# पुणे महापालिकेच्या वृक्षगणना कंत्राटावर विधान परिषदेत चर्चा; एकनाथ शिंदेंनी दिले स्पष्टीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महानगरपालिकेच्या वृक्षगणना कामाच्या निविदा प्रक्रिया आणि संबंधित कंपनीला दिलेल्या कंत्राटावर विधान परिषदेत प्रश्न उपस्थित करण्यात आला. आमदार अमित गोरखे यांनी यापूर्वी त्रुटी आढळलेल्या कंपनीलाच पुन्हा सुमारे ३० कोटी रुपयांचे कंत्राट दिल्याचा मुद्दा उपस्थित करत चौकशीची मागणी केली.

यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले की, वृक्षगणना आणि मिळकत कर सर्वेक्षण ही दोन्ही वेगवेगळी कामे असून निविदा प्रक्रिया नियमांनुसार पार पडली आहे. ऑनलाइन टेंडर, तांत्रिक छाननी आणि आवश्यक मंजुरीनंतरच कंत्राट देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शिंदे यांनी पुढे सांगितले की, संबंधित कंपनीवर पूर्वी कारवाई झाली असली तरी त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही. तसेच या प्रकरणाशी संबंधित वाद न्यायप्रविष्ट असून उच्च न्यायालयात लवाद प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, आमदार गोरखे यांनी सार्वजनिक कामांमध्ये पारदर्शकता आणि गुणवत्तेचे निकष काटेकोर पाळले जाणे आवश्यक असल्याचे सांगत या विषयाचा पुढेही पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट केले.

# इराणच्या निमंत्रणावरून राजकीय चर्चा; भाजपचे नितीन नवीन, काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे यांना अंत्यसंस्काराचे आमंत्रण

## अयातुल्ला अली खामेनेई यांच्या अंत्यसंस्कारासाठी भारतातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांना निमंत्रण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दुबई :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या प्रस्तावित अंत्यसंस्कारासाठी भाजपचे मंत्री नितीन नवीन आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना निमंत्रण देण्यात आल्याची माहिती समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



एका बाजूला केंद्रातील सत्ताधारी भाजपचा प्रतिनिधी, तर दुसऱ्या बाजूला प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मानले जात आहे.

या निमंत्रणामुळे भारत-इराण संबंध, परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय राजनैतिक संकेत यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या निमंत्रणाचा स्वीकार करायचा की नाही, याबाबत संबंधित नेत्यांकडून किंवा भारत सरकारकडून अंतिम भूमिका जाहीर झालेली नाही.

# व्हॉट्सॲपच्या 'यूजरनेम' फीचरवर केंद्र सरकारची गंभीर चिंता; फसवणूक आणि बनावट ओळखीचा धोका वाढणार?

## 'यूजरनेम' सुविधेमुळे सायबर गुन्हेगारांना मिळू शकते नवे हत्यार

## सुरक्षेच्या मुद्द्यावर केंद्र सरकारचा मेटाला जाब; लवकरच उच्चस्तरीय बैठक होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जगातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या मेसेजिंग ॲपपैकी एक असलेल्या व्हॉट्सॲपच्या प्रस्तावित 'यूजरनेम' फीचरवर केंद्र सरकारने गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. या नव्या सुविधेमुळे ऑनलाइन फसवणूक, बनावट ओळख निर्माण करणे (इम्पर्सोनेशन) आणि सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त करत इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने **(MeitY)** मेटा कंपनीसोबत तातडीची बैठक बोलावण्याची तयारी सुरू केली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, व्हॉट्सॲप लवकरच मोबाईल क्रमांकाऐवजी 'यूजरनेम'द्वारे संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या तयारीत आहे. ही सुविधा वापरकर्त्यांच्या गोपनीयतेसाठी उपयुक्त असल्याचा दावा कंपनीकडून केला जात असला, तरी त्याच सुविधेचा गैरफायदा सायबर गुन्हेगारांकडून घेतला जाऊ शकतो, अशी भीती सरकारने व्यक्त केली आहे.

**बनावट ओळख निर्माण करण्याचा धोका**

सरकारच्या मते, यूजरनेम प्रणाली लागू झाल्यानंतर एखाद्या व्यक्तीचे, कंपनीचे, बँकेचे किंवा सरकारी संस्थेचे नाव वापरून बनावट प्रोफाइल तयार करणे अधिक सोपे होऊ शकते. यामुळे सामान्य नागरिकांची दिशाभूल होण्याची शक्यता वाढेल. आधीच डिजिटल अटक, घधउ अपडेट, बँक खाते गोठविण्याच्या नावाखाली होणाऱ्या सायबर फसवणुकीत मोठी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत व्हॉट्सॲपवरील नवीन फीचर सायबर गुन्हेगारांसाठी आणखी प्रभावी साधन ठरू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

**मेटाला सरकारचे कठोर प्रश्न**

केंद्र सरकार मेटाकडे काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर स्पष्टीकरण मागणार असल्याचे समजते. त्यामध्ये यूजरनेमची पडताळणी कशी केली जाणार, प्रसिद्ध व्यक्ती, सरकारी संस्था किंवा कंपन्यांच्या नावाचा गैरवापर कसा रोखला जाणार, बनावट खात्यांवर किती वेगाने कारवाई केली जाणार आणि भारतीय कायद्यांचे पालन कशा पद्धतीने केले जाणार, यासारख्या मुद्द्यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, व्हॉट्सॲपवरील संवाद एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड असल्यामुळे फसवणुकीच्या अनेक प्रकरणांमध्ये तपास यंत्रणांनाही अडचणी येतात. त्यामुळे नव्या फीचरमुळे गुन्हेगारांना अधिक सुरक्षित वातावरण मिळेल का, याबाबतही सरकारला चिंता आहे.

**सायबर फसवणुकीत सातत्याने वाढ**

देशात गेल्या काही वर्षांत ऑनलाइन फसवणूक, बनावट गुंतवणूक योजना, डिजिटल अटक, बनावट ग्राहक सेवा आणि सोशल मीडिया इम्पर्सोनेशनच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. अनेक प्रकरणांमध्ये गुन्हेगार स्वतःला बँक अधिकारी, पोलीस अधिकारी किंवा सरकारी कर्मचारी म्हणून सादर करून नागरिकांची आर्थिक फसवणूक करतात.

तज्ज्ञांच्या मते, मोबाईल क्रमांकाऐवजी आकर्षक किंवा अधिकृत वाटणारा यूजरनेम दिसू लागल्यास सामान्य वापरकर्त्याला खरे आणि बनावट खाते ओळखणे अधिक कठीण होऊ शकते. त्यामुळे फसवणुकीचे नवे प्रकार समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**गोपनीयता विरुद्ध सुरक्षा**

एका बाजूला मोबाईल क्रमांक सार्वजनिक न करता संवाद साधण्याची सुविधा गोपनीयतेच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. मात्र दुसऱ्या बाजूला अशा सुविधेचा गैरवापर रोखण्यासाठी मजबूत पडताळणी यंत्रणा, तक्रार निवारण प्रक्रिया आणि संशयास्पद खात्यांवर तात्काळ कारवाई आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

सरकारचे म्हणणे आहे की, वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे संरक्षण जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांची डिजिटल सुरक्षितता सुनिश्चित करणेही आवश्यक आहे. त्यामुळे कोणतेही नवीन फीचर लागू करण्यापूर्वी त्याचे संभाव्य परिणाम आणि सुरक्षा उपायांचा सखोल विचार होणे गरजेचे आहे.

**मेटाची भूमिका काय?**

मेटाकडून अद्याप या मुद्द्यावर अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नसली, तरी कंपनीने यापूर्वी वापरकर्त्यांच्या गोपनीयतेला प्राधान्य देत विविध सुरक्षा वैशिष्ट्ये लागू केल्याचा दावा केला आहे. आता सरकारसोबतच्या बैठकीनंतर यूजरनेम फीचरमध्ये अतिरिक्त सुरक्षा उपायांचा समावेश केला जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**सरकारची भूमिका स्पष्ट**

सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर कोणतेही तंत्रज्ञान किंवा डिजिटल सुविधा नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड करणारी ठरू नये, यावर केंद्र सरकार ठाम असल्याचे या घडामोडीतून स्पष्ट होत आहे. व्हॉट्सॲपचे यूजरनेम फीचर गोपनीयतेसाठी उपयुक्त ठरणार की सायबर गुन्हेगारांसाठी नवे